**नियमीति दिवाणी दावा क्र १६/२०२४**
रेश्मा वि. ग्रामसेवक
CNR No. MHOS140000382024

## अर्ज निशाणी क्र. १८ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादींनी दाखल करुन असे कथन केले आहे की, मौजे ब्रम्हगाव ता. परंडा येथील गट क्रमांक ३ पैकी क्षेत्र ९ हे. ३१ आर पैकी ९४ आर वादी क्रमांक १ ते ३ यांच्या नावे असून ज्याची चतुःसीमा पुर्वेस– गावठाण, पश्चिमेस–राहुलन बबन जाधव, दक्षिणेस – रावसाहेब तेली व उत्तरेस – परंडा ते बार्शी रस्ता अशी आहे. वर नमुद चतुःसीमेतील जमिनी वादींचा मालकी ताबा होता व आहे. प्रतिवादी हे वादींच्या जमिनीच्या पुर्व बाजुने अतिक्रमण करुन हद्दीखुणा नष्ट केल्या आहेत. प्रतिवादींनी वादींच्या जमिनीवर पुर्व बाजुने किती क्षेत्रावर अतिक्रमण केले आहे आणि हद्दीखुणा कायम करण्याकरिता कोर्ट कमिशनगर म्हणून उपअधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, परंडा यांची नेमणुक करुन वादींची जमीन ९४ आर याची मोजणी करुन मोजणी अहवाल नकाशासह दाखल करणेबाबत तसेच नकाशाप्रमाणे हद्दीखुणा कायम करणेबाबत आदेशीत व्हावे अशी विनंती केली आहे.

२. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास त्यांचे लेखी म्हणणे दाखल केलेले नाही.

३. वादींच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

४. संचिकेचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा दावा वादींच्या मालकीच्या जमिनीच्या पुर्व बाजुने प्रतिवादींनी हद्दीखुणा नष्ट करुन अतिक्रमण करु नये, असा निरंतर मनाई हुकूम मिळण्याकरिता दाखल करण्यात आला आहे. दाव्याचे स्वरुप व उभय पक्षातील वाद विषयाचा विचार करता वादींच्या नावे असलेले गट क्रमांक ३ मधील ९४ आर क्षेत्राची मोजणी करणे आवश्यक आहे. सबब, कोर्ट कमिशनर म्हणून उपअधिक्षक, भुमी अभिलेख परंडा यांची नेमणुक करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# <u>आदेश</u>

१. अर्ज नि. क्र. **१८ मंजुर** करण्यात आला.

२. प्रस्तुत प्रकरणात कोर्ट कमिशनगर म्हणून उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, परंडा यांची नेमणुक करण्यात येत आहे.

३. उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, परंडा यांना आदेशीत करण्यात येते वादी क्रमांक १ ते ३ यांच्या नावे असलेली गट क्रमांक ३ मधील ९४ आर ज्याची चतुःसीमा पुर्वेस– गावठाण, पश्चिमेस–राहुलन बबन जाधव, दक्षिणेस – रावसाहेब तेली व उत्तरेस – परंडा ते बार्शी रस्ता या चतुःसीमेतील जमिनीची मोजणी करुन करुन तसा अहवाल नकाशासह या प्रकरणात आजपासून एक महिन्याच्या आत सादर करावा. तसेच नकाशाप्रमाणे जमिनीच्या हद्दखुणा कायम करण्यात याव्यात.

४. वादींना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी ९४ आर क्षेत्राची मोजणी फीस उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, परंडा यांच्याकडे जमा करावी. तसेच आवश्यक ते कागदपत्र देखील संबंधीत कार्यालयात सादर करावेत.

५. वरील आदेशाप्रमाणे उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, परंडा यांना तसे पत्र पाठविण्यात यावे.

ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH

Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2025.11.11 10:58:14 +0530

दिनांकः–१०.११.२०२५

**(अ. अ. शेख)**

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Vaibhav Mohanrao Ingale<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 10-11-2025 |
| Order signed by the presiding officer on | - | 10-11-2025 |
| Order uploaded on | - | 11-11-2025 |